Pune Police

सत्यमेव जयते

# प्रेस नोट

दि. ०२/०२/१७

**पुणे शहरांतील रेकॉर्डवरील वाहन चोर हा सिक्युरीटी गार्ड म्हणून सिंहगडरोड ,कात्रज सहकारनगर,न-हे आंबेगाव या परिसरातून व इतर भागात काम करुन सोसायटीतील पार्कींग मधुन दुचाकी वाहन चोरी करणा-या चोरास प्रॉपर्टी सेल गुन्हेशाखेने जेरबंद केले.**

प्रॉपर्टी सेलकडील नेमणुकीस असलेले पो.ना.५५८५ दिनकर भुजबळ यांना त्यांचे बातमीदार कडून माहिती मिळाली कि, रेकॉर्डवरील वाहन चोरीतील आरोपी नामे प्रसाद शिणकर हा एक ग्रे रंगाची ॲक्टीव्हा गाडी पुढे मागे नंबर नसलेली चोरीची वापर करीत असले बाबत मिळालेल्या माहितीवरुन प्रभारी अधिकारी एस.व्हि.शिंदे,प्रॉपर्टी सेल,गुन्हेशाखा,पुणे शहर यांनी आपले अधिपत्याखालील कर्मचारी स्टाफ यांचेबरोबर मिळाले माहिती प्रमाणे ग्रिन लॅण्ड कांऊटी,न-हे मानाजीनगर पुणे येथे सापळा रचला असता, सदर ठिकाणी एक ग्रे रंगाचे ॲक्टीव्हा गाडीवर एक इसम येताना दिसता बातमीदाराने तो वाहन चोर असल्याचे इशारा करताच सोबतचे स्टाफचे मदतीने त्यास लागलीच तो चालवित असलेल्या ग्रे रंगाचे मोटारसायकसह ताब्यात घेवून त्यास त्याचे नांव पत्ता विचारता त्याने आपले नांव पवन ऊर्फ प्रसाद पुरुषोत्तम शिनकर वय १९ वर्षे धंदा सिक्युरीटी रा. सध्या ग्रिन लॅन्ड कांऊटी शॉपींग मॉलमधील साई मॅचिंग शॉप दुकानाचे टेरेसवर न-हे मानाजीनगर पुणे असे असल्याचे सांगितले त्यास प्रॉपर्टी सेल कार्यालय गुन्हे शाखा येथे आणुन त्याचे कडे गाडी बाबत चौकशी करता त्याने सदरची ॲक्टीव्हा गाडी सन २०१६ ऑगस्ट मध्ये कात्रज येथून वंडर सिटी सोसा कात्रज पुणे येथून सायंकाळचे वेळी डुप्लीकेट चावी व काणसच्या सहाय्याने लॉक उघडून चोरी केल्याचे कबूल केलेने त्यास दिनांक १/०२/२०१७ रोजी १४.४५ वा अटक करणेत आली त्याचे कडे अधिक तपास केला असता, त्याने एकूण १४ वाहने त्यामध्ये ९ ॲक्टीव्हा, १ पल्सर, ४ स्प्लेंडर मोटारसायकल किं.रु.३,५८,०००/- ची पंचनाम्याने जप्त करण्यात आलेली आहेत. **सदरची वाहने भारती विदयापीठ पो स्टे कडील ५ सिंहगड पो स्टे १ सहकारनगर पो स्टे ३ कोंढवा पो स्टे २ शिवाजीनगर पो स्टे १ विश्रामबाग पो स्टे १ स्वारगेट पो स्टे १** अशी वाहने त्याचे कडून हस्तगत करण्यात आलेली आहेत.तसेच त्याचे कडून १२ सायकल जप्त करण्यात आल्या आहेत.

सदरची कारवाई मा.अप्पर पोलीस आयुक्त,,पुणे शहर श्री. दिपक साकोरे सो, मा.पोलीस उप-आयुक्त, गुन्हे,पुणे शहर श्री.पी.आर.पाटील सो, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे-१ पुणे शहर,श्री.सुरेश भोसले यांचे सुचनांप्रमाणे प्रॉपर्टी सेल प्रभारी अधिकारी एस.व्हि. शिंदे, पोना दिनकर भुजबळ , सहापोफौ आजिनाथ वाकसे, पोहवा संतोष मोहिते, सुभाष कुंभार ,महेश पवार सिध्दराम कोळी, संभाजी गायकवाड, जितेंद्र तुपे, संजय जगताप राजू झुंझुरके, पोशि चंद्रकांत हाके, संजय सुर्वे, यशवंत खंदारे, सहापोफौ ढोले यांनी केलेली असून पुढील तपास प्रॉपर्टी सेलकडील वरि.पो.निरिक्षक एस.व्हि. शिंदे करीत आहेत.

